AC – 20/05/2025
Item No. – 5.45 (N) Sem-III 2(a)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for Marathi - AEC** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG Second Year Programme** | |
| **Semester** | **III** |
| **Title of Paper** | **लेखन कौशल्ये -२ (महाजालावरील लेखन)** |
| **Credits** | **2** |
| **From the Academic Year** | **2025-26** |

**Syllabus**
**B.A. (Marathi AEC)**
**(Semester - III)**

**Title of Paper : लेखन कौशल्ये - २ (महाजालावरील लेखन)**

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1. | **अभ्यासक्रमाचे वर्णन :** **(Description of the Course )** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर (Wholistic Development) भर देते. या धोरणात सर्वांगीण विकासाचा भाग म्हणून **क्षमता वर्धन अभ्यासक्रम (Ability Enhancement Course)** या स्तंभांतर्गत भाषिक कौशल्य अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या सत्रामध्ये 'आधुनिक भारतीय भाषां'चे अध्ययन अनिवार्य करण्यात आले आहे. सदर **क्षमता वर्धन अभ्यासक्रमा**चे स्वरूप प्रामुख्याने भाषाकेंद्री असावे, असेही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या भाषिक कौशल्यांचा तपशीलवार परिचय करून देणे, तसेच ती कौशल्ये आत्मसात करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, ही या अभ्यासक्रमाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे लक्षात घेऊन **'लेखन कौशल्ये - २ (महाजालावरील लेखन)' (श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे.<br>आंतरमहाजाल हे एकविसाव्या शतकातील अत्यंत प्रभावी साधन आहे. जगभरातील संगणक एकमेकांशी जोडले जाऊन त्यांचे जाळे तयार झाले आहे. विविध सामाजिक माध्यमस्थळांवर स्वतःचे खाते (अकाउंट) तयार करणे आणि त्यावर मराठी भाषा व देवनागरी लिपीतून लिहिणे, ही समकालीन संपर्क व्यवहारातील आवश्यक बाब झाली आहे. यास अनुसरून आपल्या अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळवून देणारी अनुदिनी (ब्लॉग) तयार करणे, विकिपीडियावर भोवतालातील भाषा, साहित्य, संस्कृतीशी निगडित माहितीपर व विश्लेषणात्मक नोंदी लिहिणे, सामाजिक माध्यमस्थळांवरील आपल्या खात्यावर सातत्याने अभ्यासपूर्ण लेखन करणे, स्वक्षमतेशी निगडित समाजगट / आभासी कट्टे (कम्युनिटी ग्रुप) तयार करणे, या बाबींसाठी आवश्यक सामाजिक माध्यमस्थळ साक्षरता आणि मराठी भाषा व देवनागरी लिपीतून लिहिण्याची क्षमता **'लेखन कौशल्ये - २ (महाजालावरील लेखन)' (श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. |

| | | |
|---|---|---|
| **2.** | **Vertical** | Ability Enhancement Course |
| **3.** | **Type** | Theory |
| **4.** | **Credit** | 2 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| **5.** | **Hours Allotted** | 30 Hours<br>(AEC या स्तंभांतर्गत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासपत्रिकांच्या कार्यभारासंबंधी मुंबई विद्यापीठाच्या दिनांक २३ जुलै, २०२४ च्या NO.AAMS_UGS/ICC/2024-25/19 या परिपत्रकाचा आधार घ्यावा.) |
| **6.** | **Marks Allotted** | 50 Marks |
| **7.** | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. महाजालावरील लेखन कौशल्याचे स्वरूप समजावून सांगणे.<br>२. महाजालावर प्रभावी लेखन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रांचा परिचय करून देणे.<br>३. नेहमीच्या पठडीतील लेखन व महाजालावरील लेखन यांमधील साम्य-भेद स्पष्ट करणे.<br>४. विविध सामाजिक माध्यमस्थळांवर लेखन करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित करणे. | |
| **8.** | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना महाजालावरील लेखन कौशल्याचे स्वरूप समजेल.<br>२. विद्यार्थ्यांना महाजालावर प्रभावी लेखन करण्यासाठी आवश्यक तंत्रांचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना नेहमीच्या पठडीतील लेखन व महाजालावरील लेखन यांमधील साम्य-भेद स्पष्ट होईल.<br>४. विद्यार्थ्यांमध्ये विविध सामाजिक माध्यमस्थळांवर लेखन करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित होतील. | |
| **9.** | **अभ्यासघटक (Module) :** | |
| | **घटक - १ : सामाजिक माध्यमस्थळांवर मराठी भाषा व देवनागरीतून लेखन (भाग - १)** | |
| | अ) अनुदिनी (ब्लॉग) लेखन<br>आ) विकिपीडियावरील लेखन<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १)<br>(सूचना : विद्यार्थ्यांमध्ये उपरोक्त सामाजिक माध्यमस्थळांवर लेखन करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित होतील या दृष्टीने शिक्षकांनी सराव करून घ्यावा.) | |

| | |
|---|---|
| | **घटक -२ : सामाजिक माध्यमस्थळांवर मराठी भाषा व देवनागरीतून लेखन (भाग - २)** |
| | अ) फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स यांवरील लेखन<br>आ) समाज गट (कम्युनिटी ग्रुप), आभासी कट्टे यांवरील लेखन<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन-१)<br><br>(सूचना : विद्यार्थ्यांमध्ये उपरोक्त सामाजिक माध्यमस्थळांवर लेखन करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित होतील या दृष्टीने शिक्षकांनी सराव करून घ्यावा.) |
| **10.** | **पाठ्य ग्रंथ (Text books) :** N. A. |
| **11.** | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *मराठी व्याकरण आणि लेखन*, विनायक गंधे व मीरा जोशी, निराली प्रकाशन, पुणे, २०१२.<br>२. *उपयोजित मराठी*, (संपा.) केतकी मोडक व अन्य, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.<br>३. *मराठी भाषिक कौशल्य विकास,* (संपा.) पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८.<br>४. व्यावहारिक मराठी, ल. रा. नसिराबादकर, भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२३.<br>५. *Aayushi International Interdisciplinary Research Journal* (ISSN 2349-638x) Peer Reviewed Journal www.aiirjournal.com |

| | | |
|---|---|---|
| **12.** | **Internal Continuous Assessment : 40%** | **External, Semester End Examination : 60% Individual Passing in Internal and External Examination** |

| | |
|---|---|
| **13.** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : २० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) |

| | |
|---|---|
| **14.** | **बहिर्गत परीक्षा** (**External Examination**) **: ३० गुण (वेळ : एक तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** (**Format of Question Paper**) **:**<br>१. प्रत्येकी **१५** गुणांचे एकूण **तीन** प्रश्न विचारावेत. त्यांपैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवावेत.<br>२. पहिले **दोन** प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. दोन्ही घटकांवर आधारित **१५** गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले **दोन** प्रश्न विचारावेत.<br>३. **तिसरा** प्रश्न हा घटक क्रमांक एक व दोनवर आधारित **१५** गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. प्रत्येक घटकावर दहा याप्रमाणे एकूण **वीस** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही **पंधरा** प्रश्न सोडवावेत. |

| Sd /- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of the BOS Chairman**<br>**Prof. Dr. Satish Kamat**<br>**Board of Studies in Marathi** | **Sign of the**<br>**Offg. Associate Dean**<br>**Dr. Suchitra Naik**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the**<br>**Offg. Associate Dean**<br>**Prof. Manisha Karne**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the**<br>**Offg. Dean**<br>**Prof. Anil Singh**<br>**Faculty of Humanities** |